प्रकरण २ रे

# संशोधित व संबंधित साहित्याचे सिंहावलोकन



**फक्त श्रवणाने तुमच्या व्यक्तीमत्वाच्या सौंदर्याला निखार येणार नाही. तत्वांबद्दल सखोल चिंतन करून ती हळूहळू आत्मसात केली पाहिजेत. तुम्ही जे काही शिकला आहात त्याबद्दल इतरांशी चर्चा केल्याने हे लवकर साध्य होते.**

# संशोधित व संबंधित साहित्याचे सिंहावलोकन

प्रस्तुत संशोधन समस्येशी निगडीत साहित्याचे समालोचन करणे आवश्यक ठरते. कारण त्यामुळे संशोधकाला तुलनात्मक माहिती, उचित संशोधन पध्दती आणि संशोधनाचे तंत्र याबद्दल निश्चित कल्पना येते.

## २.१ साहित्य समालोचनाची उद्दिष्ट्ये :-

१. संदर्भ साहित्याच्या माध्यमातून स्वत:चे ज्ञान वृध्दिंगत करणे.

२. संशोधन विषयासंबंधी गृहितकृत्य, त्याची मांडणी याबाबत निश्चित माहिती प्राप्त करणे.

३. निवडलेल्या विषयासंबंधी पूर्वी झालेल्या संशोधनाचा अभ्यास करुन त्या बाबतची पुनरावृत्ती टाळणे.

४. आधारसामग्री व निष्कर्ष यासंबंधी तुलनात्मक माहिती मिळवून समर्पक सांख्यिकीय तंत्र व त्याचा उपयोग आणि निर्वचन करण्यासाठी मार्गदर्शन प्राप्त करणे.

### संशोधनाशी संबंधित साहित्य :-

१. विविध नियतकालीकांमधून प्रकाशित होणाऱ्या साहित्याचा आढावा.

२. ग्रंथ स्वरुपात प्रकाशित झालेले माहिती व सैध्दांतिक स्वरुपाचे साहित्य.

३. इंटरनेटवर उपलब्ध असणारे साहित्य.

### संशोधित साहित्य :-

विविध विद्यापीठातील आचार्य पदवीसाठी जे प्रबंध सादर झालेत त्यापैकी २० संशोधनाचा विस्तृत आढावा या ठिकाणी घेण्यात आला आहे. ह्या मुद्यावरील साहित्य शोध करण्यासाठी खालील पुस्तकांचा आधार घेण्यात आला आहे.

1. Buch M.B. (1979) : A Survey of Research in Education Baroda Centre of Advance study in Education

2. Buch M.B. (1979) II[nd] Survey of Research in Education Baroda Society for Educational Research Development

3. Buch M.B. (1986) III[rd] Survey of Research in Education New Delhi NCERT

4. Buch M.B. (1991) IV the Survey of Research in Education Vol. No. 1 New Delhi NCERT

5. Buch M.B. (1991) V Survey of Research in Education Vol. No. 2 New Delhi NCERT

6. Buch M.B. (1997) V Survey of Research in Education Vol. No. 2 New Delhi NCERT

## 2.2 संशोधित साहित्य :–

आचार्य पदवीसाठी सादर झालेल्या प्रबंधाचा आढावा

१) अग्रवाल, कुसुम १९९२ "Educational Philosophy of Ramatirth" Ph.D. Edu.Agra University

**उद्दिष्ट्ये**:- १) रामतीर्थ ह्यांच्या शैक्षणिक विचारांना व तात्विक विचारांना विश्लेषीत करणे.

२) शैक्षणिक विचारांचे भारतीय करणाच्या दृष्टिकोनातून व्यावहारिक सूचना देणे.

**कार्यपध्दती** :- प्रस्तुत संशोधनात तात्विक दृष्टिकोनातून विश्लेषणात्मक अभ्यास घेण्यात आला आहे.

**निष्कर्ष** :- १) शिक्षण हे जीवन ध्येयावर आधारीत असावे.

२) शिक्षणाचे ध्येय हे अंतर्गत क्षमतेला अभिव्यक्त करण्याची पात्रता वृध्दिंगत करणे हे असावे.

३) अभ्यासक्रमात भारतीय आदर्शाचा समावेश असावा.

४) वेदांताचे व्यावहारिक ज्ञान विद्यार्थ्यांना देण्यात यावे.

५) शिक्षण प्रक्रियेत भौतिक, आध्यामिक, व्यक्तिगत घटकामध्ये समतोल असावा.

६) राष्ट्रप्रेम हे शिक्षणाचे ध्येय असावे.

७) शिक्षण हे आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण करणारे असावे.

2) Bhagwanti (1988) Educational Philosophy of Dr. Radhakrishnan and its Relevance for Social Chage

**उद्दिष्ट्ये** :- १) विचारवंत म्हणून डॉ. राधाकृष्णन ह्यांचे स्थान पाहणे.

२) डॉ. राधाकृष्णन ह्यांचे सामाजिक स्थान तपासून पाहणे.

३) डॉ. राधाकृष्णन यांच्या शैक्षणिक तत्वज्ञानाची चर्चा करणे.

४) डॉ. राधाकृष्ण ह्यांच्या विचारांचा सामाजिक Relevance पाहणे.

**निष्कर्ष** :- १) तत्वज्ञानाचे हे जीवन जगण्याची कला व मार्ग आहे.

२) Spiritual Counsciousness वर तत्वज्ञान आधारीत आहे.

३) संस्कृती मूल्य व परंपरा ह्या शिक्षणाचा पाया असावा.

3) Bharate A.C. (1992) : A Study of Philosophy of Acharya Vinoba Bhave and its Effect on Education in Light of New Educational Policy (Ph.D. (Edu.) Nagpur.

**उद्दिष्ट्ये** :- १) आचार्यांच्या तत्वज्ञानाचा अभ्यास करणे.

२) NPE चा सखोल अभ्यास करणे.

३) NPE व आचार्यांच्या तत्वज्ञानाचा सहसंबंधाचा अभ्यास करणे.

४) नवीन शिक्षण प्रणालीवरील आचार्यांच्या तत्वज्ञानाचा प्रभाव पडताळणे.

**निष्कर्ष** :- १) नवीन अभ्यासक्रम हा नवीन आव्हानांना समोर ठेऊन तयार करण्यात आला आहे.

२) नवीन अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आलेल्या बाबी आचार्यांच्या तत्वज्ञानात आढळतात.

३) आचार्यांच्या बऱ्याच संकल्पना ह्या नवीन अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आल्या आहेत.

4) Chavada Jhaverilal Premjibhai 1991 : A Study of the Educational Thoughts of Mankad D. and its Implementation, Ph.D. Edu. Saurashtra University

**उद्दिष्ट्ये** :- १) D. मंकड ह्यांच्या शैक्षणिक तत्वज्ञानाचा अभ्यास करणे.

२) जीवनातील शिक्षणाच्या अधिष्ठानाचा शोध घेणे.

३) अभ्यासक्रमाच्या पायऱ्या सुचविणे.

४) शिक्षकाच्या जबाबदाऱ्या सांगणे.

५) सामाजिक उत्थानाकरिता शिक्षणाचे कार्य सांगणे.

६) DM च्या तत्वज्ञानाच्या दृष्टकोनातून संस्थेच्या कार्याचा अभ्यास करणे.

**निष्कर्ष** :- DM हे हे ग्रामीण केंद्री शिक्षण व अभ्यासक्रमाच्या नैतिक अधिष्ठानाबाबत सकारात्मक विचार करणारे होते.

5) Das Gayadhar, 1990 Educational Philosophy of Sri. Aurobinda and its Experiments in Orisa (Ph.d. Edu. Utkal University)

**उद्दिष्ट्ये** :- १) एकात्म शिक्षणाच्या विविध घटकांवर प्रकाश टाकणे.

२) To maintain the Ideas of aconcerming te school plant school pattern curriculum methods of teaching the teacher, environment discipline,Institutional

Management, Evaluation

**निष्कर्ष :-** १) श्री अरविंद ह्यांच्या एकात्मिक शिक्षणात पूर्ण मानवाचे मानसशास्त्र सामावलेले आहे.

२) एकात्म शिक्षणाचे ५ घटक आहे. Phisical Vita, Mental Physic and Spiritual.

३) Three principles of Internal Education 1. Noting can be thought, 2. The mind has to be consulted on it growth. 3.अध्यापनाची तीन साधने आहेत. Instruction, example & influence.

४) एकात्म शिक्षणात समाज शिक्षक, पालक, संचालक, अध्ययनकर्ता आणि अभ्यासपुरक उपक्रम ह्यांचा समावेश होतो.

6) Dwivedi Kamla (1991) : A Comparative Study of the Educational Philosophy of Gandhiji in the World Perspective (D.Lit. Edu. Kanpur)

**उद्दिष्ट्ये** :- १) गांधीजींच्या जीवन तत्वज्ञानाचे विश्लेषण करणे.

२) गांधीजींच्या शैक्षणिक तत्वज्ञानाचे विश्लेषण करणे.

३) गांधीजींच्या शैक्षणिक तत्वज्ञानाची इतर तत्वज्ञानाशी तुलना करणे.

४) म. गांधीजींच्या विचारांची इतर तत्वज्ञांच्या विचारांशी, उपशाखांशी तुलना करणे.

**निष्कर्ष** :- १) गांधीजींचे विचार मुलांना आध्यात्मवादी आहेत. पण त्यात कार्यवाद व प्रयोगवादाचे देखील प्रतिबिंब आढळते.

२) गांधीजींनी शिक्षणाचा अर्थ विकसित केला आहे.

7) Gogte V. V. (1991) : A Critical Study of Samartha Ramadas Contribution to the Fied of Education

**उद्दिष्ट्ये** :- १) समर्थांच्या शैक्षणिक विचारांचे विश्लेषण करणे.

२) रामदासांनी स्थापन केलेल्या मठांचे शैक्षणिक योगदान पाहणे.

३) वर्तमान काळात समर्थांच्या विचारांचे मूल्यमापन करणे.

**निष्कर्ष** :- १) समर्थांनी खऱ्या ज्ञानावर शिक्षणात भर दिला आहे.

२) आत्मसाक्षात्कर हे शिक्षणाचे ध्येय आहे.

३) समर्थांनी श्रवण, वाचन, मनन, संगीत व धार्मिक पुस्तकांच्या अध्ययनावर भर दिला आहे.

४) शिक्षकांचे वर्गीकरण - गुरु व सत्‌गुरु असे केले आहे.

५) अध्यापन पध्दती - चर्चा पध्दत, recitation, listening, question, answer method, playway method.

६) Cearner Central Education वर भर दिला आहे.

७) शिक्षण ही यशाची गुरुकिल्ली आहे.

८) मानवाच्या विकासाकतिा नैतिक व सामाजिक शिक्षणाची आवश्यकता आहे.

९) स्त्री शिक्षण व विकासाबाबत सकारात्मक दृष्टिकोन आढळतो.

8) Prabhune, R. G. (1990) : A Critical Study of the Literature of Sane Guruji from the Educational Point of View

**उद्दिष्ट्ये** :- १) साने गुरुजींच्या साहित्यातील शैक्षणिक उद्देशांचा शोध घेणे.

२) साने गुरुजींच्या साहित्यातून शैक्षणिक विचारांचा शोध घेणे.

३) शैक्षणिक मूल्यांचा शोध घेणे.

**निष्कर्ष** :- १) प्रत्येक गोष्टीचा पाया प्रेम हा आहे. प्रेमाशिवाय शिक्षकाचे अध्यापन व्यवस्थित होत नाही.

२) मूलभूत मूल्य - प्रेम, ज्ञान, शक्ती

३) प्रत्येक व्यक्तिला शिक्षणाचा अधिकार असावा.

४) निसर्ग हा मोठा गुरु आहे.

५) शिक्षण हे उत्पन्न प्राप्त करण्याचे साधन असावे.

६) चारित्र्य निर्मितीचे साधन शिक्षण आहे.

9) Sharma Adarsha (1990) Nature and Development of Personality in the Bhagwad Geeta, Education Relevance in the Present Society (Ph.D. Edu. Kurukshetra University)

**उद्दिष्ट्ये** :- १) मानवी वर्तनाच्या कारणांचा शोध घेणे.

२) सर्जनशीलतेचा शोध घेणे.

**निष्कर्ष** :- १) मानवी व्यक्तिमतवाचे तीन पैलू असतात.

२) मानवाचे अज्ञान दूर करुन त्याचा सर्वांगीण विकास घडवून आणणे हे गीतेचे ध्येय आहे.

10) Abhayankar S. V. A Comprehensive in Depth and Critical Analysis of Swami Vivekanandas Educational Thougts and A Philosophical Foundation with Special Focus on Value Education in the Contest of Nucleare and Space Age, Globle Value Crisis and the Need for Value Education in India Today (Ph.D. Edu. Pune University)

**उद्दिष्ट्ये** :- १) विवेकानंदाच्या शैक्षणिक विचारांना विश्लेषित व एकत्रित करणे.

२) आधुनिक युगात मूल्यशिक्षणाची आवश्यकता पडताळणे.

३) विवेकानंदांच्या विचारांचे प्राचीन विचारधारांमध्ये मूळ शोधणे.

**निष्कर्ष** :- १) विवेकानंदांचे शिक्षण विषयक विचार हे अद्वैतवादावर आधारीत आहेत.

11) Gupta R. P. (1985) A Study of Educational Thoughts of Swami Vivekanda (Ph.D. Edu. Rohilkhand University)

**उद्दिष्ट्ये** :- १) स्वामी विवेकानंद यांनी शारीरिक व मानसिक विकसावर भर दिला आहे.

२) जीवनाची तयारी म्हणजे शिक्षण होय.

३) शिक्षणाच्या माध्यमातून राष्ट्रीय एकात्मता सामंजस्य निर्माण व्हायला हवे.

४) शिक्षणातून चारित्र्याचा विकास व्हायला हवा.

५) मातृभाषा हे शिक्षणाचे माध्यम असावे.

६) स्वयंपूर्ण बनविते ते शिक्षण.

७) अभ्यासक्रमात धार्मिक शिक्षण, वेदांतील शिक्षण, शारीरिक शिक्षण इत्यादी विषयांचा अंतर्भाव असावा.

८) भारतीय संकृती व परंपरा ह्यांचा अंतर्भाव असावा.

९) वर्तमानकालीन गरजा पूर्ण करणारे शिक्षण आवश्यक आहे.

१०) शिक्षकांचा दर्जा आवश्यक आहे.

12) Kesari H. (1986) The Geeta as Learning Process with Reference to Modern Education (Ph.D. Edu. Osm University)

**उद्दिष्ट्ये** :- १) वैयक्तिकतेच्या दृष्टिकोनातून पुढील संकल्पनांचा अभ्यास करणे. Self, absolute self, material world, education for material welfare,fearlessness, process of education.

२) जीवनाच्या अंतिक ध्येयाची परिभाषा करणे तसेच मानवी समस्यांच्या कारणाचे विश्लेषण करणे.

३) काही संकल्पनांचे विश्लेषण करणे. Acquisition of wisdom purification of mind. नैतिक मूल्यांचा विकास, व्यक्तिमत्वाचा व राष्ट्रीय एकात्मतेचा विकास.

**निष्कर्ष** :- १) भागवद्‌गीता हे teaching learning चे एका पाठ्यपुस्तकच आहे.

२) भगवद्‌गीता ही शिक्षणाला आशय प्राप्त करुन देते.

३) Geetas Metaphysicas आणि teaching learning process

ह्या आत्मसाक्षात्काराच्या दृष्टिकोनातून मानवाच्या व्यक्तिमत्व विकासासाठी आवश्यक आहेत.

४) गीता हे खालील तीन घटकांबाबत जागृती निर्माण करणारे Text Book आहे.

1. Principle of Life 2. Purpose of Life 3. Process of Life

13) Lalita C. H. (1967) The Educational Philosophy of Gandhi and Dewey

14) Misra Shiva Saran Critical Study of Educational Philosophy and Teaching Method of Swami Vivekanda

**निष्कर्ष** :- १) विवेकानंदांनी वेद आणि उपनिषदांवर गाढ श्रध्दा होती.

२) स्वामी विवेकानंद हे भारतीय तत्वज्ञानाचे उपासक होते.

३) त्यांनी वेदांत समाजाचीच स्थापना केली आहे.

४) केवळ माहिती संपादन करणे म्हणजे शिक्षण नाही तर अंतर्गत क्षमता अभिव्यक्त करणे म्हणजे शिक्षण होय.

५) Teacing Methologies - Contact, एकाग्रता, स्वयंअनुभव, प्रश्नोत्तर पध्दती.

६) स्वामीजींनी संस्कृत अभ्यासावर भर दिला आहे.

७) चारित्र्य व सकारात्मक दृष्टिकोन शिक्षकाकरिता आवश्यक आहे.

15) Raghawan J. A Critical Study of Shri Aurobindas Contribution of Building of Modern Indian Philosophy of Education (Ph.D. Edu. Nagpur Univ.)

**उद्दिष्ट्ये** :- १) प्राचीन व आधुनिक तत्वज्ञानाच्या दृष्टिकोनातून अरविंदाच्या तत्वज्ञानाचे मूल्यमापन करणे.

२) अरविंदाच्या तत्वज्ञानातील तत्वमिमांसा, मूल्यमिमांसा, ज्ञानमिमांसा ह्यांचा पाश्चात्य विचारांच्या दृष्टिकोनातून शोध घेणे.

३) अरविंद, म. गांधी व गुरुदेव टागोर ह्यांच्या विचारांची तुलना करणे.

16) Rai M. A.: मदनमोहन मालवीय के शैक्षिक विचारोका अध्ययन

**उद्दिष्ट्ये** :- १) मदनमोहन मालीय ह्यांच्या कौटुंबिक व सामाजिक पार्श्वभूमीचा अभ्यास करणे.

२) शिक्षणाचे ध्येय, गरज, स्वरुप ह्यांचे अध्ययन करणे.

३) विद्यार्थ्यांची जबाबदारी आणि शिस्त ह्याबाबत त्यांचे मत जाणून घेणे.

17) Sanyal Meera (1986) Ramakrishna Mission and Its Impaction Contemporary Indian Education (Ph.D. Edu. Lucknow University)

**निष्कर्ष** :- १) मानवाजवळ दैवी शक्ती असतात. त्याच्या विकसनाकरिता त्यांनी विशेष प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.

२) वैज्ञानिक व तांत्रिक विकास दुर्लक्षित व्हायला नको.

३) शालेय अभ्यासक्रमात आरोग्यशास्त्र विषयाचा अंतर्भाव करायला हवा.

४) शिक्षक आणि विद्यार्थी ह्यांच्यात परस्पर सहकार्य हवे.

५) तात्विक व प्रात्यक्षिक भागावरील भर आवश्यक आहे.

६) रामकृष्ण मिशनची सामाजिक भूमिका महत्वाची आहे.

18) Patel M. V. (1990): A Critical Study of Educational Philosophy of Pancholi

19) Samuddar Sunanda (1990): Educational Contribution of Pandit Ishwarchandra Vidyasagar Analysis of Humanism, Nuterialism and Scientism in his Educational Philosophy (Ph.D. Edu. Kalyani University)

20) Shankar Hari (1991) : Comparative Study of Philosophical and Educational Views of Maharshi Aurobinda and Rousseau (Ph.D. Edu.Kumau University)

21) Sharma Indira (1992) A Critical Evaluation of J. Krishnamurtis Thoughts on Education (Ph.D. Edu. Agra Dayalbhag Educational Institute)

22) Sharma Uma Rani (1989) A Comparative Study of The Education Ideas of Sarvapalli Radhakrishnan and Bertrand Russelil (Ph.D. Edu. Uni. of Allahabad)

23) Tiwari Urmilla (1989) Educational Philosophy of J. Krishnamurthy and its Implication for Modern System of Indian Education (Ph.D. Edu. Panjab Uni.)

24) Bhattacharya Sandip (1991) An Analysis of Tagores Educational Thoughts in Evolving a Conceptial Framework of Open University in India (Ph.D. Edu. Viswa Bharti)

25) Pereira J. J.: Narayan Guru as a Social Education Ph.d. Ker. 1985

26) Raval H. H.: A Study of Educational Ideals as depicted in Buddhistic Philosophy

27) Sharma R. S., Humanism in the Educational Philosophy of Shri Aurobinda (Ph.D. Edu. Nee University)

28) Singh K. P. (1985) A Critique on Educational thoughts of Dr. Zakir Husain (Ph.D. Edu. Nee University)

29) Singh S. P. (1983) The Educational Doctrins of Plato and Sri. Aurobindo A comparative Study (Ph.D.Edu. Avadh University)

30) Sinha R. (1984) Tagore and Whiteheads Ideas on Educations a Comparative Study (Ph.D. Edu. Kur University)

वरील संशोधनावर दृष्टीक्षेप टाकल्यास एक बाब प्रकर्षाने जाणवते की, प.पू. स्वामी चिन्मयानंद ह्यांचेवर अद्याप काहीही संशोधन झालेले नाही. प्रस्तुत संशोधनासाी मात्र उपरोक्त संशोधनाचा अतिशय उपयोग झाला. तो पुढील मुद्यांच्या संदर्भात

१) स्वामी चिन्मयानंदांच्या विचारांच्या दृष्टिकोनातून शैक्षणिक विचारांचे विश्लेषण करणे व ह्याकरिता विविध शैक्षणिक संकल्पनांचा आधार ह्या प्रस्तुत संशोधनाने प्राप्त झाला आहे.

२) विविध तत्वज्ञ, विचार धारा, शाखा ह्यांचा शैक्षणिक दृष्टिकोनातून अभ्यास करण्यात आला पण तात्कालीन शिक्षणाच्या दृष्टिकोनातून हा विचार झालेला नाही.

३) विविध आधुनिक संकल्पनांचे मूळ विविध तत्वांच्या विचारात शोधण्यात आले नाही.

४) विविध तत्वज्ञ, विचारधारा ह्यातून शिक्षणाबाबतचा विस्तृत आराखडा देण्यात आलेला नाही.

५) मूल्य शिक्षणाची एखादी योजना ह्यात देण्यात आलेली नाही.

६) नवीन परिस्थितीत ह्या सर्व विचारांची योग्यता ही देण्यात आलेली नाही.

वरील सर्व मुद्यांचा विचार हा ह्या प्रस्तुत संशोधनात करण्यात आलेला आहे व ह्या मुद्यांवर आधारीत संशोधनाची उद्दिष्ट्ये ठरविण्यात आली आहेत.

## २.३ संशोधनाशी संबंधित साहित्य :-

नियतकालीकांमधून प्राप्त होणारे साहित्य :–

प.पू. स्वामी चिन्मयानंद ह्यांच्या शैक्षणिक विचारांवर आज पावतो पाहिजे तसा प्रकाश टाकण्यात आलेला नाही. विविध साहित्यांचा शोध घेत असतांना एक बाब प्रकर्षाने लक्षात आली की, प.पू. गुरुदेवांच्या व्यक्तिमतवावर अनेक पैलूंवर अनेक लेखांमधून प्रकाश टाकण्यात आला आहे. त्यात प्रामुख्याने राष्ट्रभक्त गुरुदेव, धर्मनिष्ठ गुरुदेव, संस्कृतीप्रिय गुरुदेव, शिस्तप्रिय गुरुदेव, भारतीय तत्वज्ञानाचे उपासक, अद्वैतवादाचे कट्टर पुरस्कर्ते, हिंदुत्वाचे भाष्यकार अशा विविध विषयावर विविध साहित्य उपलब्ध आहेत. पण ''शिक्षा तज्ज्ञ'' ह्या भूमिकेतून आजवर केवळ दोनच लेख संशोधकाला आढळली त्याचा संदर्भ पुढीलप्रमाणे.

१) भागवत स.वि. ह्यांचा चिन्मय आदेश मे, २००२ च्या अंकात ''परमपूज्य गुरुदेव स्वामी चिन्मयानंद आचार्य ! शिक्षक ! सद्‌गुरु ! मार्गदर्शक ! ह्या लेखात आचार्य म्हणून गुरुदेवांच्या व्यक्तिमत्वाचे वर्णन केले आहे. ह्या लेखाच्या सुरवातीलाच त्यांनी आचार्य ह्या शब्दाची परिभाषा दिली आहे. ''आचिनोती शास्त्रार्थ'' ह्यानुसार ''चि'' ह्या संस्कृत धातुचा अर्थ गोळा करणे असा आहे. ही कृती प.पू. गुरुदेवांची होती. ते केवळ शास्त्रग्रंथाचे अभ्यासकच नव्हे तर ते त्यांची साधक वृत्तीने खंडीण करीत असत. त्यांची भूमिका आचार्यांची शिक्षकाची होती होती आणि म्हणूनच त्यांनी रचनात्मक सदाचाराचा संप्रदाय निर्माण केला. तो चिन्मय मिशनच्या रुपात व ह्याचे दोन महत्वाचे घटक म्हणजे सदाचाराचे जीवन जगणारे गृहस्थी व सन्यासी गुरुदेवांनी स्वत: वेदांत प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम तयार केला. त्यासाठी अध्ययन, अध्यापन पध्दतीचे स्वत: निर्धारण केले. त्यांनी आपले सर्व लक्ष हे तरुणांवर केंद्रीत केले होते. तरुणांनी संयम व शिस्तीत वागल्यास समजाची प्रगती शक्य आहे, असे त्यांना वाटे. त्यांनी उद्‌बोधनाबाबत शिस्तीबाबत, सांस्कृतिक संस्करणाबाबत एक परंपराच निर्माण केली. परिणामी आजही त्यांचे कार्य त्यांनी सांगितलेल्या मार्गावरुन अव्याहतपणे सुरु आहे. ह्या अर्थाने ते हाडाचेच शिक्षक ठरतात.'' आपल्या मिशनचे सभासद हे हिमालयात राहणाऱ्या संघर्षाच्य युगातील आघाडीचे वीर आहे. असा त्यांचा साधकाबाबतचा दृष्टिकोन होता. ह्यांचा हा दृष्टिकोन राष्ट्रीय पण होता. हे साधक म्हणजेच उद्याचे नेते आहेत. त्यांना राष्ट्राच्या

जबाबदाऱ्या उचलायच्या आहेत, असे त्यांचे मत होते. अर्थात त्यांची दृष्टीही स्वविकास, समाज विकास, राष्ट्रविकास अशी होती. वर्तमानातील जागतिक समस्यांवर एकच उपाय आहे व तो म्हणजे भारताचे सांस्कृतिक जागरण ह्यासाठी गुरुदेवांनी चिन्मय मिशनच्या माध्यमातून जे विविध कार्यक्रम दिलेत त्यातून त्यांनी माणूस घडविण्याच्या क्रियेला प्रारंभ केला आहे. माणूस घडविणे हे कार्य खऱ्या अर्थने जातीवंत शिक्षकाचे कार्य आहे. ह्यासाठी त्यांनी अभ्यासाची एक विशिष्ट पध्दतही ठरवून दिली होती. त्यांचा असा आग्रहच होता की, केलेला अभ्यास चर्चेच्या माध्यमातून विषयाचे केलेले मनन ह्यामुळे आपल्या व्यक्तिमत्वात अमुलाग्र बदल होऊ शकते. ह्याचे महत्वाचे कारण म्हणजे हा अभ्यास म्हणजे एक प्रकारे अखंड जीवनानुभव असतो. प. पू. गुरुदेवांनी आपल्यातील शिक्षक आजही त्यांच्या कार्यातून जागृत ठेवला आहे. एवढेच नाही तर उत्तम विद्यार्थ्यांमधील शिक्षकही त्यांनी जागृत ठेवला आहे. ह्याच दृष्टीने ते उत्तम शिक्षक होते.

२) भागवत स.वि. ''प.पू. गुरुदेव स्वामी चिन्मयानंद एक महान शिक्षणतज्ज्ञ'' चिन्मय आदेश, जून २००२

प्रस्तुत लेखात मा. स.वि. भागवत ह्यांनी प.पू. गुरुदेवांच्या शैक्षणिक विचारांवर सर्व प्रथम प्रकाश टाकला आहे. वास्तविक शिक्षक व शिक्षणतज्ज्ञ ह्या भूमिका एकाच व्यक्तिमत्वात सापडणे ही बाब दुर्मिळ असते. पण प.पू. गुरुदेवांच्या व्यक्तिमत्वात हा दुर्मिळ योग आपणास आढळतो. शिक्षण तज्ज्ञ कुणाला म्हणावे ह्याबाबत श्री. भागवत म्हणतात, ''शिक्षणक विषयक धोरण आखणे, वेगवेगळ्या प्रकारचे अभ्यासक्रम, परीक्षापध्दती तयार करुन त्यांची अंमलबजावणी करणे, शिक्षक व विद्यार्थी संबंधाचा तसेच पालक व पाल्या संबंधाचा सखोल अभ्यास करुन त्याबाबत मार्गदर्शन तत्वे आखून देणे, शिक्षण क्षेत्रातील विद्यमान सुविधा व अडचणी ह्यांचा विचार करुन त्यावर उपाययोजना सुचविणे, शैक्षणिक धोरणातून निर्माण होणाऱ्या समस्यांचा विचार करणे अशा अनेक बाबींचा विचार शिक्षणतज्ज्ञाला करावा लागतो. तो स्वामी चिन्मयानंदांनी केला आहे.'' ह्या आशयाने गुरुदेव हे शिक्षणतज्ज्ञ ठरतात. स्वामी चिन्मयानंदांनी अलौकिक ज्ञानाचा विचार केला आहे. लौकिक ज्ञानाचे जे अधिष्ठान आहे हे कळल्याशिवाय ज्ञानाला अर्थ प्राप्त होत नाही. आध्यात्मिक शिक्षणाचे महत्व त्यांनी आपल्या

विचारातून व्यक्त केले आहे. कारण ज्यांच्यासाठी व ज्यांनी ह्या योजना राबवायच्या ते दोन्ही घटक शांत शुध्द असायला हवेत. लौकिक जीवनात माणूस अलौकिक जीवन मूल्यांना जोपर्यंत मानाचे स्थान देत नाही. तोपर्यंत माणूस हा सुसंस्कारित असत नाही. ह्यातून गुरुदेवांनी शिक्षणाचा संबंध हा मूल्याशी जोडला आहे. ही जबाबदारी केवळ शिक्षकांचीच नाही तर पालकांचीही आहे. पालकांनी स्वत:मध्ये बदल करालया हवा. ही जबाबदारी घरातील स्त्रिने उचलायला हवी.

शिक्षण संस्था ह्या चांगले शिक्षण देणाऱ्या हव्यात. संस्कार करणारे विविध उपक्रमच त्यांनी समाजाला दिले. गुरुदेवांनी स्थापन केलेल्या बाल विहार उपक्रम म्हणजे राष्ट्रासाठी इतिहास घडविणारा कार्यक्रम आहे. ही संस्काराची कार्यशाळा आहे. हेच उद्दिष्ट्य डोळ्यासमोर ठेऊन १९६५ मध्ये चिन्मय विद्यालयाचाही उपक्रम सुरु आहे. त्यांनी प्रचलीत परीक्षा पध्दती मध्येही सुधारणा सुचविल्या आहेत. वेगवेगळ्या वयोगटातील शिक्षणाची योजना ही त्यांनी सुचविली आहे. उद्याचा भारत घडविण्याच्या दृष्टीने प.पू. गुरुदेवांनी बालके व तरुणांवर लक्ष केंद्रीत केले. त्यांच्या दृष्टिकोनावर आधारीत CVP अर्थात Chinmaya Vision Programm हा मोठा प्रकल्प साकारला आहे. १९९६ पासून हा कार्यक्रम चिन्मय विद्यालय तसेच इतर शाळांमध्ये राबविण्यात येतो. ह्या कार्यक्रमच्या माध्यमातून हिंदू संस्कृतीचे दालन मूलांना खुले करुन दिले जाते. त्याचप्रमाणे राष्ट्रप्रेमाची भावना वाढीस लावली जाते व त्यांच्यात वैश्विक दृष्टिकोन निर्माण केला जातो. ह्याशिवाय व्यवस्थापन क्षेत्रात वेदांताचा आणि व्यवस्थापनाचा परस्पर संबंध कसा आहे. यावर संशोधन करणारी Chinmaya Management Institute आहे. तसेच विज्ञान व आध्यात्म ह्यांच्यातील दुवा साधणारी Chinmaya International Foundation ही संस्था कार्यरत आहे. हे सर्व कार्य प.पू. गुरुदेव शिक्षणतज्ज्ञ असल्याची साक्ष देत आहेत.

## संशोधनाशी संबंधित पुस्तके :-

प.पू. स्वामी चिन्मयानंदांच्या शैक्षणिक विचारांशी निगडीत असणारा महत्वाचा दस्तऐवज म्हणजे C.V.P. पुस्तिका अर्थात Chinmaya Vision Programm. प.पू. गुरुदेवांच्या शैक्षणिक दृष्टिकोनावर आधारीत हा मूल्याधिष्ठित मूल्यशिक्षणाचा कार्यक्रम आहे. ह्या

कार्यक्रमाचे थोडक्यात प्रारुप परिशिष्टात जोडण्यात आलेले आहे. (परिशिष्ट)

प्रस्तुत प्रारुप चिन्मय मिशनच्या शिक्षण विभागातील तज्ज्ञ मंडळींनी तयार केलेले आहे व २१ मे, १९९६ पासून ह्याची राबवणूक विविध शाळांमध्ये सुरु आहे.

C.V.P. चे निरिक्षण केल्यास एक बाब जाणवते ती ही की, प.पू. गुरुदेव हे द्रष्टे होते. शिक्षणाबाबत त्यांचा दृष्टिकोन अतिशय व्यापक होता, सखोल होता. शिक्षणातून ह्यांच्या एकात्म मानव दृष्टिकोन लक्षात येतो. हा सर्वंकष असा दृष्टिकोन आहे. मानव हा केंद्र असून त्याचा सर्वांगीण विकास व त्यांचा राष्ट्रीय, सांस्कृतिक व वैश्विक विकास हा महत्वाचा आहे. मानव हा स्वपासून विकसित होऊन तो संस्कृती व राष्ट्र संकल्पनेशी एकरुप होतो व त्यानंतरच त्याच्यात वैश्विक दृष्टिकोन निर्माण होऊ शकतो. हा एकात्म दृष्टिकोन त्याचा आहे. त्यांचे ह्या दृष्टिकोनावरच विशेषत्वाने प्रकाश टाकण्याचा प्रयत्न प्रस्तुत संशोधनात करण्यात आलेला आहे.

स्वामी चिन्मयानंदांच्या शैक्षणिक तत्वाज्ञानाचा भागावर विशेष संबंधित साहित्य जरी उपलब्ध नसले तरी त्यांना जीवनाचा व कार्याचा परिचय करुन देणारी विपूल ग्रंथसंपदा आजही उपलब्ध आहे. ह्या ग्रंथसंपदेचा येथे उल्लेख करणे म्हणजे अक्षरश: महासागराला एका पात्रात बंदीस्त केल्यासारखे होईल. पण त्यातील काही निवडक ग्रंथाचा ह्या ठिकाणी उल्लेख करण्यात येत आहे.

१) Journey of a Master Swami Chinmayananda By Nany Patchen (The Man of the Path, the Teaching)

प्रस्तुत पुस्तक हे प.पू. स्वामी चिन्मयानंदांचे जीवन चरित्र आहे. स्वामी चिन्मयानंदांचे कार्य व त्यांची शिकवण अस ह्या पुस्तकाचे स्वरुप आहे. प्रस्तुत पुस्तकाची सुरवात ही स्वामी चिन्मयानंदांच्या कार्याच्या पार्श्वभूमिवर अर्थात त्याच्या आध्यात्मिक सामाजिक कार्याचा प्रारंभ होण्यापूर्वी जी सामाजिक, राजकीय परिस्थिती भारतात होती त्याचे वास्तव दर्शनाने झाली आहे. त्यानंतर लेखकाने प.पू. गुरुदेवांचे जीवन चरित्र अतिशय बारकाव्यासहीत रेखाटले आहे व ह्या रेखाटनातून वाचकांना गुरुदेवांच्या व्यक्तिमत्वाचा परिचय करुन दिला

आहे. प्रस्तुत पुस्तकाचा गाभा म्हणजे प.पू. गुरुदेवांनी स्थापन केलेल्या चिन्मय मिशनचे कार्य. ह्या कार्याचा प्रारंभ, विस्तार व आज चिन्मय मिशनचे असणारे कार्य ह्या सर्वांचा परिचय म्हणजे पुस्तकाचा गाभा आहे. पुस्तकाच्या अंतिम टप्प्यात प.पू. गुरुदेवांचे विचार व त्यांची शिकवण ह्यावर लेखकाने प्रकाश टाकला आहे. प्रस्तुत पुस्तकाच्या लेखिकेने आपल्या मनोगतात प.पू. गुरुदेवांवर खालील विचार व्यक्त केले आहे. "Swami Chinmayananda was a human being who had the courage independence, and innate intelligence to realize his divinity. He was a man his life and his teaching offer us a model of what humanity is possible. Certainly we can worship Swamiji as God but we must not fail to worship ourselves as God too. This incridible truth was the essence of this teaching."

२) Call of the Canch (History of Chinmaya Movement) Compiled by Swami Chinmayananda, Rukmani Ramani

प्रस्तुत पुस्तक हे चिन्मय चळवळीच्या इतिहासातील पहिले पुस्तक आहे. ज्यात चिन्मय मिशनची ५० वर्षाची वाटचाल रेखाटण्यात लेखकांना यश प्राप्त झाले आहे. प्रस्तुत पुस्तकात प.पू. गुरुदेवांच्या जीवनाचा आढावा घेण्यात आला असून चिन्मय मिशनचे कार्य परिचय ह्यात विस्तृतपणे देण्यात आला आहे. चिन्मयमिशनचे कार्य देशभरात पसरले आहे. आजही हे कार्य आपली व्याप्ती वाढवित आहे. अशा ह्या कार्याचा संपूर्ण इतिहास प्रस्तुत पुस्तकात देण्यात आला आहे. चिन्मय मिशनचा प्रांरभ, त्याचा देशात व विदेशातील झालेल्या विस्ताराचे विस्तृत विवेचन प्रस्तुत पुस्तकात आढळते. एवढेच नाही तर स्वामी चिन्मयानंदांच्या कार्याबबतचा दृष्टिकोन कायम ठेऊन आजही चिन्मय मिशनची वाटचाल प.पू. स्वामी तेजोमयानंद ह्यांच्या मार्गदर्शनात अत्यंत तेजस्वीपणे सुरु केली आहे. ह्याचेही वर्णन आपणास प्रस्तुत पुस्तकातून पहावयास मिळतात. प.पू. स्वामी तेजोमयानंदजींनी आपल्या प्रस्तावनेत ह्या पुस्तकास "As a reference manual for Research students" असे ह्या पुस्तकाचे वर्णन केले आहे.

३) चिरंतन गुरु - लेखिका राधिका कृष्णकुमार - अनुवाद सौ. सविता आनंद चक्रवर्ती, C.C.M.T. नोव्हेंबर, २००१

प्रस्तुत पुस्तकाच्या प्रस्तावनेत प.पू. स्वामी तेजोमयानंद यांनी असे म्हटले आहे की, ''हे पुस्तक म्हणजे मला माहिती असलेल्या महानतम आधुनिक ऋषींच्या जीवन आणि शिकवण यांचा मागोवा घेण्याचा नम्र तरीही प्रामाणिक आणि प्रमाणभूत प्रयत्न आहे. लिखित काय किंवा उच्चारीत शब्द काय ''कल्पनातीताचे'' वर्णन करु शकणार नाहीत किंवा अमर्याद मोजू शकणार नाहीत आणि तरी सुध्दा महान स्वामीच्या जीवनातील घटना व परिणाम दुसऱ्यांना सांगतांना अवर्णनीय आनंदाचा अनुभव येतो.'' प.पू. गुरुजींचे ह्या उद्गाराची प्रचिती आपल्याला प्रत्यक्ष पुस्तकाचे वाचन करतांना आल्यावाचून रहावत नाही. पुस्तकाच्या प्राक्कथनात प्रस्तुत प्रकल्पाचे मार्गदर्शन प.पू. स्वामी पुरुषोत्तमानंद सरस्वती ह्यांनी असे विधान केले आहे की, ''आधुनिक काळाची गरज लक्षात घेऊन भारतीय संस्कृतीत भगवान वेदव्यास, शंकराचार्य, स्वामी विवेकानंद इत्यादी महान ऋषी गुरुपरंपरेचा मागोवा घेत प्रगटलेले युगाचार्य व तत्वज्ञ, संत भगवद् स्वरुप स्वामी, चिन्मयानंद महाराज यांचे ज्ञानमय, प्रेममय व सेवामय जीवन दृष्टी (Vision) व कार्य (Mission) यशस्वी जीवन जगण्याच्या दृष्टीने जिज्ञासुंना विशेष उद्बोधक व प्रेरणादायक आहे.'' वरील दोन्हीही विधानावरुन ह्या पुस्तकाचे स्वरुप आपणास लक्षात येते. प्रस्तुत पुतक हे इंग्रजी पुस्तकाचा अनुवाद आहे. प्रस्तुत पुस्तकात प.पू. गुरुदेवांचे जीवन चरित्र रेखाटण्यात आले असून त्यांच्या कार्याचा आढावाही ह्या पुस्तकात घेण्यात आला आहे.

आपला वारसा निसटल्यामुळे पतन पावलेल्या हिंदुंना पुनरुज्जीवन प्राप्त करुन देण्यास प.पू. गुरुदेवांनी सहाय्य केले. त्यांचा जीवनप्रवास अतिशय प्रेरणादायी आहे. ह्या सर्वांचे अत्यंत सुरेख चित्रण ह्या पुस्तकात आपणास पहावयास मिळते.

४) Chinmaya Vishwa - A Global Movement (1951-2001) C.C.M.T. Mumbai - 2001

प्रस्तुत पुस्तकाचे रुप व्यक्त करतांना प.पू. स्वामी तेजोमयानंदांनी विधान केले आहे की, "Chinmaya Vishwa presents the Saga of service that the Chinmaya

Movement has been rendering to this entire world. Vishwa and the Saga continues."

प्रस्तुत पुस्तकाच्या प्रारंभिक भागात विदेशातील जगभरातील विविध देशामधील चिन्मय मिशन स्थापनेचा इतिहास देण्यात आला आहे. देशाचा नकाशा व त्या देशातील चिन्मय मिशन केंद्र याची विस्तृत माहिती ह्यात देण्यात आली आहे. ह्यात प्रामुख्याने ऑस्ट्रेलिया, न्युझिलॅंड, अमेरिका, कॅनडा, युरोप, आफ्रिका,नेपाळ, श्रीलंका इ. देशातील चिन्मय मिशन केंद्राचा इतिहास देण्यात आला आहे. त्यानंतर भारतातील संपूर्ण चिन्मय मिशन केंद्राचा आढावा ह्यात घेण्यात आला आहे. पुस्तकाच्या अंतिम भागात प.पू. स्वामी चिन्मयानंद ह्यांनी १९५१ ते १९९३ ह्या काळात घेतलेल्या देश विदेशातील सर्व ज्ञान यज्ञांचा आढावा घेण्यात आला आहे. चिन्मय चळवळीचा इतिहासाबाबत विस्तृत वर्णन आपणास ह्या पुस्तकात पहावयास मिळते.

५) Swami Chinmayananda As I Know him - C.C.M.T. Mumbai -1997

प्रस्तुत पुस्तकाबाबत अखिल भारतीय चिन्मय युवा केंद्राचे सचिव लिहितात, "This book is a small attempt by All India Chinmaya Yuva Kendra to spread. His massage to keep his flame a live. In the ensuing pages you will find refreshing experience narrated lovingly by the devotees" प.पू. गुरुदेव जेथे जेथ गेलेत तेथे तेथे तरुण वर्ग त्यांच्याकडे आकर्षित झाला एवढेच नव्हे तर त्यांचा खरा अनुयायी बनला. त्यांनी लाखोंच्या हृदयाला स्पर्श केला व त्यांच्या जीवनात कायापालट घडवून आणला. जे जे लोक त्यांच्या संपर्कात आले व त्याच्या आयुष्याचा कायापालट झाला. अशा काही साधकांच्या लिखित अनुभवाचे संकलन म्हणजे प्रस्तुत पुस्तक होय.

६) दृष्ट्यामिच पुनः पुनः - (साधकांच्या स्मृतीतील स्वामी चिन्मयानंद) C.C.M.T. - संकलन व रुपांतर शालीनी मराठे - २००१

प्रस्तुत पुस्तकास शुभेच्छा देतांना प.पू. स्वामी तेजोमयानंद लिहितात, "प.पू. गुरुदेव स्वामी चिन्मयानंदाच्या आठवणीचा हा संग्रह सर्व मराठी वाचकांना निश्चित आनंददायक

ठरेल.''  ह्या पुस्तकाबाबत प.पू. स्वामी पुरुषोत्तमानंद म्हणतात, ''प.पू. गुरुदेव स्वामी चिन्मयानंद महाराजांच्या प्रत्यक्ष संपर्कात आलेल्या अनेक भक्तांना व शिष्यांना गुरुदेवांच्या बोलण्यातून, लिखाणातून व वागण्यातून असे अनेक जीवन विकासात्मक हितोपदेशाचे अविस्मरणीय अनुभव आलेले आहेत.''  प्रस्तुत पुस्तक हे अशाच आठवणीचे संकलन आहे.  ह्या पुस्तकातून व साधकांना आलेल्या अनुभवातून प.पू. स्वामीजींच्या व्यक्तिमत्वाच्या महत्वाच्या पैलूचा परिचय होतो.  प.पू. गुरुदेवांचे व्यक्तिमत्व चतुरस्त्र होते.  ह्या व्यक्तिमत्वाने अनेकांना आपलेसे केले व त्यांची आयुष्याला एक नवीन दिशा मिळाली, असे हे संकलन म्हणजे प.पू. गुरुदेवाच्या व्यक्तिमत्वाचा परिचय करुन देणारे असे पुस्तक आहे.

७) पूजामूलं गुरु।  पदम।। - स्मरणिका - चिन्मय मिशन, मुलुंड C.C.M.T. मुंबई

प.पू. स्वामी चिन्मयानंदांची अष्टोत्तर शत नामावली ही प.पू. स्वामी तेजोमयानंदांची अत्यंत महत्वपूर्ण अशी रचना आहे.  ही केवळ नामावलीच नाही तर ह्या नामावलीतून विचाररुपाने अभिव्यक्त होणाऱ्या प.पू. गुरुदेवांजवळ जाण्याचा व गुरुदेवांना विचार रुपात धरुन ठेवण्याचे ते एक साधन आहे.  १९८१ मध्ये प.पू. तेजोमयानंदांनी ह्या नामावलीची रचना केली.  ह्या नामावलीचे तीन भाग आपण करु शकतो.

१. निर्गुण, निराकार गुरुतत्वाचे निर्देशन करणारी नावे.

२. गुरुच्या सगुण साकार रुपाचे वर्णन करणारी नावे.

३. गुरुदेवांच्या सद्‌गुणांचे व त्यांच्या कार्याचे वर्णन करणारी नावे.

प्रस्तुत पुस्तकातून ह्या तीनही दृष्टींनी प.पू. गुरुदेवांचे दर्शन आपणास घडते. प्रत्येक नामास अनुसरुन आपणास गुरुदेवांच्या व्यक्तिमत्वाचा परिचय ह्या पुस्तकाच्या माध्यमातून होतो पण त्याच बरोबर त्यांचे विचार हे आपल्या जीवनाचे अधिष्ठान बनल्यावाचून रहात नाही.

८) Chinmaya Heritage Centre - Dedication commemodation souvenir Oct.2004

This unique souvenir - Chinmaya Heritage Centre dedication

commemoration souvenir is prayer fully dedicated to the revered memory of Pujya Gurudev Swami Chinmayananda. We are confident that Gurudev will continue to bless us and inspire us to march forward by his invisible presence and divine guidance.

प्रस्तुत सोव्हेनिअर समितीने ह्या उद्‌गाराने प.पू. गुरुदेवांचा गौरव केला आहे. ह्या पुस्तिकेत, गुरुदेवांच्या गौरवार्थ काही लेख देण्यात आले आहे. ह्या लेखामधून गुरुदेवाच्या व्यक्तिमत्वाचे अनेक पैलू आपल्यासमोर उलगडतात.

९) Sparks from the fire - C.C.M.T. 2000

परमपूज्य गुरुदेवांच्या कार्याचा गाभा म्हणजे वेदांत प्रचार व प्रचाराचे कार्य हे कार्य योग्यरित्या व्हावे म्हणून त्यांनी जे कार्य व्यवस्थापन केले त्याचाच एक भाग म्हणजे त्यांनी सांदीपनी साधनालयांची स्थापना केली व त्यातून वेदांताचे प्रशिक्षण घेतलेला. एक अभ्यासू निसंगवृत्तीचा व सेवाभावी सेवक वर्ग निर्माण केला. आज ह्याच सेवकांच्या माध्यमातून चिन्मयगंगा अव्याहतपणे वहात आहे व सर्वसामान्यांच्या जीवनात आध्यात्मिक समृध्दीची हिरवळ निर्माण करुन लोकांचे जीवन समृध्द करीत ओ. ह्यातील सर्वात महत्वाचा घटक म्हणजे सन्यास प्राप्त केलेले आचार्य होत. अशा आचार्यांची संक्षिप्त माहिती त्यांच्या फोटोसहित ह्या पुस्तकात देण्यात आली आहे. ह्या पुस्तकाच्या संदर्भत प.पू. स्वामी तेजोमयानंद म्हणतात, "This booklet covers those of Pujya Gurudev's disciples who received the Sanyas Diksha. They entraced the fourth station of their life. The master recognised in them a special potential for spiritual work. More than seventy of them are listed here and basic information.

१०) More Sparks from the fire - C.C.M.T. 2000

प.पू. स्वामी तेजोमयानंद म्हणतात, "Pujya Gurudev Swami Chinmayanandaji was the fire and his students are the sparks that came out from the fire. This booklet places on Record those who took

Brahmacharya, as well as some who have committed themselves in a significant way to the Mission and are serving at centres arround the world.

प्रस्तुत वाक्यावरुन ह्या पुस्तकाचे स्वरुप लक्षात येते.

११) Chinmaya Mission - Transforming Lives - Text - Viji Sundaram - Concept and design by Nahalingum Kalapen - Chinamaya Mission west 2001

चिन्मय मिशन ही केवळ संस्था नाही तर ती एक चळवळ आहे. संस्थेचे ध्येय मर्यादित नाही तर मानवी जीवनाच्या प्रत्येक अंगाचा विकास हे संस्थेचे ध्येय आहे. ही राजकीय किंवा सामाजिक संस्था नाही. Many projects one goal". हे मिशनचे ध्येय आहे. ह्या सर्व प्रकल्पाचे प्रतिबिंब आपणास ह्या प्रस्तुत पुस्तकात बघावयास मिळते. ह्या पुस्तकाबाबत प.पू. स्वामी तेजोमयानंद म्हणतात, "This publication bring out the spirit of Chinmaya Movement most vividly in a pictorial formal with an appropriate script". १९५१ ते २००१ पर्यंतच्या चिन्मय चळवळीचा इतिहास ह्या पुस्तकात देण्यात आला आहे. ह्यात प.पू. गुरुदेवांचे गुरु स्वामी तपोवन महाराजांच्या कार्याचाही उल्लेख करण्यात आला आहे.

१२) Crescendo Peaks - Spreading Aura of Divinised Dynamism - By Chinmaya Udghosh ATCHYK

चिन्मय चळवळीच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात युवा केंद्रांनी पूर्ण केलेला हा प्रकल्प आहे. चिन्मय युवा केंद्र स्थापन करण्यामागचा गुरुदेवांचा दृष्टिकोन प.पू. स्वामी तेजोमयानंदांनी प्रारंभीच व्यक्त केला आहे. चिन्मय युवा केंद्र हे चिन्मय चळवळीचे एक सक्षम अंग आहे. प्रस्तुत पुस्तकात CHYK Movement चा इतिहास विस्तृतपणे देण्यात आला आहे.

नियतकालीकांमधून प्राप्त झालेले साहित्य :–

Pujya Gurudev - The Essence of the Scripture - Swami Tejomayananda

प्रस्तुत लेख हा प.पू. स्वामी चिन्मयानंदांच्या व्यक्तिमत्वावर विस्तृतपणे प्रकाश टाकणारा असा आहे. प.पू. गुरुदेवांच्या व्यक्तिमत्वाचे जे विविध पैलू ह्यात देण्यात आले आहेत. ते पुढीलप्रमाणे

Pujya Gurudev is

1. A peerless personality
2. An epitome of evolution
3. A cosmis chormer
4. A matchless role model
5. A magnificent mentor
6. A divide disciplinarian
7. A vast visionary
8. A lamp of love

Bhavan's Journal Sept. 15, 1999 sponsored by the Hindu मध्ये नमूद करण्यात आले आहेत की, Education for becoming rather than education for knowing evas the call given by Swami Chinmayanand education is not a process nearly employing out the mind of the teacher, by touching its knowledge into the mind of student.

Education has to be holistic it has to be rich in the sense that its catters to intellectual imotional, moral, active & apiritual all atorice. Education should concentrate on personality development aquiring

knowledge of th would adjust must with self & society & above all realiasation of the permanent values of life. An reluated man is ornament is prospevity refuse in advesity. Swamiji belived that a systematic culture of the mind & heart the process of rearing & nourising these. In other world's liberare education is the baground against which the training fo special skills should be imparted.

In thes sence true education is both diving in word & spreading out wolrd. Gurudev belived that youth of today are not usless but usedless they are not careless but caredless.

प्रस्तुत संशोधनासाठी नियतकालीकांतील लेखाच्या रुपात साहित्य उपलब्ध नाही. पण जेवढे लेख संशोधिकेला सापडले त्यानुसार संशोधनाबाबत दृष्टिकोन स्पष्ट होतो. प्रस्तुत लेखामधून निघणारे निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत.

१) प.पू. गुरुदेव हे शिक्षक, आचार्य होते.

२) चिन्मय मिशन ही पारंपारिक दृष्टिकोनातून संप्रदाय नाही पण तो रचनात्मक सदाचाराचा संप्रदाय आहे.

३) ऋषीप्रणित सिध्दांत हे विज्ञानयुगातही श्रेष्ठ आहेत ही बाब गुरुदेवांनी स्पष्ट केली आहे.

४) त्यांनी बालकांवर व तरुणांवर आपले लक्ष केंद्रीत केले.

५) माणूस घडविण्याच्या प्रक्रियेला त्यांनी प्रारंभ केला.

६) व्यक्तिमत्वाचे विकसन ही घाईघाईची प्रक्रिया नाही तर स्वाभाविक उत्क्रांती आहे हे त्यांनी पटवून दिले.

७) प.पू. गुरुदेवांनी आपल्या उपक्रमामध्ये व्यक्तिमत्व विकसनालाच प्राधान्य दिले आहे.

८) त्यांनी शिस्तीचा पाठपुरावा केला.

९) व्यक्तिमत्वास स्थैर्य येण्यासाठी त्यांनी अभ्यासपध्दती सांगितली.

१०) श्रवण साधनेतून त्यांनी श्रवणकौशल्य विकसित करण्याचा प्रयत्न केला आहे.

११) प.पू. गुरुदेवांना सांस्कृतिक पुनरुत्थानाचा पाया घालून दिला आहे.

१२) ते उत्तम शिक्षक, शिक्षणतज्ज्ञ होते. (Teacher Educationist)

१३) त्यांचे स्वत:चे शिक्षण विषयक धोरण होते. तसेच त्यांनी अभ्यासक्रम परीक्षापध्दती ह्यावरही भाष्य केलेले आहे.

१४) गुरुदेवांनी शिक्षणाची एक व्यापक सखोल परिभाषा दिली आहे.

१५) गुरुदेवांनी अध्ययन अध्यापन पध्दती अभ्यासक्रम, गुरुशिष्य संबंध, शिस्त स्वातंत्र्य, व्यक्तिमत्व विकास अशा विविध शैक्षणिक संकल्पनावर भाष्य केले आहे.

१६) स्वामी विवेकानंदाप्रमाणेच अलौकिक ज्ञान शाखेचा विचार शिक्षणात करणारे ते शिक्षणतज्ज्ञ होते.

१७) आदर्श शिक्षकाचे गुणधर्म त्यांनी सांगितले आहेत.

१८) मूल्यशिक्षण व आध्यात्मिक शिक्षणाचे महत्व त्यांनी विषद केले आहे.

१९) आधुनिक विज्ञानाच्या मर्यादा त्यांनी विषद केल्या आहेत.

२०) पालकांच्या समाजाच्या प्रती जबाबदारीवर त्यांनी विशेषत्वाने प्रकाश टाकला आहे.

२१) उपक्रमातून शिक्षण हे प्रभावी होते. ह्या आधुनिक विचार सरणीस अनुसरुन त्यांनी बालकासाठी, युवकांसाठी विविध उपक्रम दिलेत.

२२) बालक शिक्षणात स्त्रीयांची भूमिका त्यांनी मांडली.

२३) आपले स्वप्न प्रत्यक्षात येण्यासाठी त्यांनी चिन्मय विद्यालयांची पण स्थापना केली आहे.

२४) शिक्षकांच्या जबाबदाऱ्या, भूमिका त्यांनी स्पष्ट केल्या आहेत.

२५) विविध वयोगटाच्या वैशिष्ट्यांचा त्यांचा अभ्यास सूक्ष्म होता. त्यानुसारच त्यांनी संस्काराची योजना दिली आहे.

प्रस्तुत संशोधनात ह्या सर्व बाबींवर प्रकाश टाकण्यात आला आहे.